**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर-४१६ ००४.**

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविम./माध्य.-२२/ 2954
कोल्हापूर.४१६००४.
दिनांक -२८/०२/२०२२

.प्रति,

मुख्याध्यापक ,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय :- सन २०२१-२२ या वर्षी इ.१०वी च्या परीक्षेला प्रविष्ठ झालेल्या व चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देणेबाबत..**
**संदर्भ :-** राज्यमंडळ पुणे यांचे जा.क्र.करामं/परीक्षा ७/१०४७ दि.२५/०२/२०२२ चे पत्र

सन २०२१-२२ या वर्षात परीक्षेसाठी माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१०वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीच्या पाश्र्वभूमीवर शासकीय रेखाकला परीक्षेचे सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे. तरी सदर प्रकटन माहितीस्तव सादर.

(सत्यवान डी.सोनवणे),
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत - राज्यमंडळ, पुणे यांचे दि.२५/०२/२०२२ चे प्रकटन

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ०४.

## प्र क ट न

**विषय :-** सन २०२१-२२ या वर्षी इ. १० वी च्या परीक्षेला प्रविष्ट झालेल्या व चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देणेबाबत.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. शासन निर्णयानुसार ''विद्यार्थी एलिमेंटरी परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचे गुण मिळणार नाही.'' अशी तरतूद आहे.

तथापि शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने पत्र क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११/एसडी-२ दि.२१/०२/२०२२ अन्वये कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उदभवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे सन २०२१-२२ या वर्षी इयत्ता १० वी च्या परीक्षेला बसणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना सन २०२०-२१ या वर्षी एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षेला बसता आले नाही, अशा विद्यार्थ्यांनी सन २०२१-२२ मध्ये केवळ इंटरमिजीएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या श्रेणीच्या आधारे, त्यांना सन २०२१-२२ या वर्षापुरते सवलतीचे गुण देण्यास मान्यता देण्यात येत आहे असे कळविलेले आहे. सदर निर्णय फक्त सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापुरताच लागू राहील.

तरी सदर बाबत सर्व माध्यमिक शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक व संबंधित घटकांनी नोंद घ्यावी.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

दि. २५/०२/२०२२

xam 7/Arts GR for 2019 | 288